सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७९ | बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. संजय कौतिक पाटील

शिवसेना शहरप्रमुख व माजी नगरसेवकः न. पा. अमळनेर

## दिव्यांग बांधवांना ‘यूडीआयडी’ कार्ड काढणे बंधनकारक

### शासनाचे आदेश; सुविधांचा लाभ घेण्यासाठी नोंदणीचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवांना वैश्विक ओळखपत्र (यूडीआयडी) देण्यात येत आहे. वैश्विक ओळखपत्र असल्याशिवाय त्यांना कोणताही लाभ मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येक दिव्यांग बांधवाकडे यूडीआयडी कार्ड असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी दिव्यांग बांधवांनी यूडीआयडी कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे.

देशभरातील दिव्यांग व्यक्तींचा अचूक डेटाबेस तयार करण्यासाठी केंद्र सरकारने युनिक डिसॅबिलिटी आयडी प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत दिव्यांगांना ओळखपत्र दिले जाते. मात्र, आता प्रमाणपत्र आणि यूडीआयडी कार्ड कोणत्या परिस्थितीत निष्क्रिय किंवा रद्द केले जाऊ शकते. याबाबतची स्पष्ट नियमावली शासनाकडून जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये फसवणूक, मृत्यू किंवा प्रशासकीय चुकांचा समावेश आहे. कार्डधारक किंवा त्यांच्या पालकांनी आम्हाला यापुढे प्रमाणपत्राची गरज नाही, असे सांगून विनंती केल्यास कार्ड रद्द केले जाईल. वैद्यकीय मंडळ, सक्षम प्राधिकरणाने केलेल्या तपासणीत संबंधित व्यक्ती दिव्यांग नसल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित संस्थेच्या विनंतीवरून कार्ड रद्द केले जाणार आहे.




**यूडीआयडी कार्ड नसले तर?**

जर दिव्यांग बांधवांकडे यूडीआयडी कार्ड नसल्यास शिष्यवृत्ती, अनुदान, रेल्वे, बस सवलती, पेन्शन व नोकरीतील आरक्षण यांसारख्या सुविधा मिळत नाहीत. दिव्यांगत्वासाठीचा हे एकमेव राष्ट्रीय ओळखपत्र आहे. कार्ड काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात येते. त्यात शासकीय अधिकारी उपस्थित राहून हे काम करत असतात.

**पोर्टलवर नोंदणी करण्याची सुविधा**

दिव्यांग विभागाच्या पोर्टलवर नोंदणी करावी. अर्ज करून आणि कागदपत्रे सादर करून तुम्ही यूडीआयडी कार्ड आणि अपंगत्य प्रमाणपत्र मिळवू शकता. त्यामुळे गैरसोय दूर होणार आहे.

**दिव्यांगांचे एकूण प्रकार किती?**

अपंग व्यक्तींचे हक्क कायदा २०१६ नुसार दिव्यांगांचे २१ प्रकार आहेत. ज्यात अंधत्व, कर्णबधीरता, गतिमान अपंगत्व (सेरेब्रल पाल्सी), बौद्धिक अपंगत्व, मानसिक आजार, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर, कुष्ठरोग बरा झालेले व्यक्ती, बौनेपणा, रक्ताचे आजार (हिमोफिलिया), स्नायूंचे आजार (मस्कुलर डिस्ट्रॉफी) आणि बहुविकलांगता अशा विविध श्रेणींचा समावेश आहे. जेणेकरून सर्वांना समान संधी आणि अधिकार मिळतात.

**कार्ड कसे, कुठे काढावे?**

कार्ड काढण्यासाठी यूडीआयडी पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीकृत व लॉगिन केल्यानंतर ते दिव्यांगत्व प्रमाणपत्र कार्डसाठी अर्ज करू शकतात. अर्जाची स्थिती ट्रॅक होऊ शकते.

**अमळनेर तालुक्यात १ हजार ९१७ दिव्यांग बांधव**

अमळनेर तालुक्यात १ हजार ९१७ दिव्यांग बांधव आहेत. यातील १ हजार ८४८ दिव्यांग बांधवांना आतापर्यंत यूडीआयडी प्रमाणपत्र जारी झाले आहेत उर्वरित लाभार्थ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**काय आहे यूडीआयडी**

केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही दिव्यांगांसाठी युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड अनिवार्य केले आहे. यालाच ‘स्वावलंबन’ कार्ड असेही म्हणतात. यूडीआयडी कार्ड दिव्यांग व्यक्तींना शासनाकडून दिले जाते. वैश्विक ओळखपत्र असल्याशिवाय दिव्यांगांना कोणताही लाभ देता येणार नाही. त्यामुळे प्रत्येक दिव्यांगांकडे यूडीआयडी कार्ड असणे आवश्यक आहे.

**कार्डसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक**

युनिक आयडेंटिफिकेशन डॉक्युमेंट कार्डसाठी अर्ज करताना ओळखपत्र, पत्ता पुरावा, रंगीत फोटो आणि आवश्यक असल्यास अपंगत्व प्रमाणपत्र यांसारखी कागदपत्रे लागतात. त्यांची स्कॅन केलेली प्रत ऑनलाइन सादर करावी लागते. आधार कार्डसाठी ओळखीचा पुरावा (पॅन कार्ड, पासपोर्ट), पत्त्याचा पुरावा (वीज बिल, बँक पासबुक) आणि जन्मतारीख पुरावा (जन्म प्रमाणपत्र) अशी कागदपत्रे लागतात.

**दिनविशेष**

१० डिसेंबर

- सी.व्ही. रमण यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले.
- कोयना येथे ६.५ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन मोठया प्रमाणात वित्तहानी झाली.
- अपोलो १७ ही चंद्रावर उतरणारी सहावी आणि शेवटची अपोलो मोहीम ठरली.
- संजय मल्होत्रा भारतीय रिजर्व बँकेचे २६ वे गवर्नर बनले

## तपोवनातील वृक्षतोडीचा साहित्य संघटनांतर्फे निषेध

### अमळनेर येथे महसूल, विभागीय वन अधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- नाशिक येथील तपोवन परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीला येथील मराठी वाङ्मय मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद व खान्देश साहित्य संघाने निषेध केला आहे. याबाबत त्यांनी महसूल अधिकारी विभागीय वन अधिकाऱ्यांना मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की कुंभमेळ्यात साधुसंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील प्राचीन वृक्षतोड प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, ही वृक्षतोड धार्मिक व पर्यावरण मूल्यांच्या विरोधात आहे. त्यामुळे निसर्गाचा ऱ्हास होणार आहे. एकीकडे सरकार वृक्षलागवडीसाठी विविध योजना राबवून कोट्यवधी रुपये खर्च करते. दुसरीकडे त्याच वृक्षांची कत्तल करण्याचे निर्णय घेत आहे. संतश्री तुकाराम महाराज, संतश्री ज्ञानेश्वरांच्या अभंग-ओव्यांतील निसर्गप्रेम, पृथ्वी सूक्तातील पर्यावरण संवर्धनाचे शाश्वत तत्त्व आणि प्राचीन शास्त्रांमध्ये वृक्षांचे आध्यात्मिक अनन्यसाधारण महत्त्व आहे. वृक्षतोडीमुळे वाढते प्रदूषण, तापमान वाढ, जैवविविधतेचा ऱ्हास, पक्षी-वन्यजीवांच्या निवासस्थानाने नष्ट होतील. भविष्यात पाण्याचीही मोठी समस्या उद्भवेल. कुंभमेळ्याला विरोध नाही. मात्र, कुंभमेळा पर्यावरणपूरक पद्धतीने होणे आवश्यक आहे. तपोवनातील वृक्षतोड साधु- संतांच्या व वेद शास्त्रातील शिकवणींनाही हरताळ फासणारी आहे. त्यामुळे हा निर्णय रद्द करण्यात यावा. याप्रसंगी निवृत्त पोलीस निरीक्षक तथा खान्देश साहित्य संघाचे सल्लागार हिरामण कंखरे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप घोरपडे, सदस्य प्रा. डॉ. रमेश माने, मराठी वाङमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, संचालक बन्सीलाल भागवत, कार्यवाह ॲड. भय्यासाहेब मगर, खान्देश साहित्य संघाचे जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर, जिल्हा उपाध्यक्ष रजनी पाटील, जिल्हा सचिव उमेश काटे, तालुका उपाध्यक्ष शरद पाटील, तालुका सचिव गोपाल हडपे, चंद्रशेखर पाटील आदी उपस्थित होते.

## खा.शि. मंडळ निवडणूक

## प्रत्येक बूथवर फोटोग्राफर, सीसीटीव्ही कॅमेरा बसवावा

### हेमंत पवार, अरुण पाटील यांचे सचिवांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी दि. ४ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व्हावी, यासाठी प्रत्येक बूथवर फोटोग्राफर व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी श्री. हेमंत पवार व राष्ट्रवादी ओबीसी सेलचे शहराध्यक्ष अरुण पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी खा. शि. मंडळाच्या सचिवांना मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की मतदारांच्या अचूक ओळखीसाठी मतदानाच्या दिवशी सभासदाचे नाव, फोटो, मतदार क्रमांक,



मोबाईल क्रमांक आणि पत्त्यासह संपूर्ण माहिती संकलित करावी. मतदार यादी फोटोसहित अद्ययावत करण्याचे काम एका खासगी संस्थेमार्फत झाले आहे. मात्र, तरीही अद्याप अनेक ठिकाणी यादी अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभुमीवर प्रत्येक बूथवर फोटोग्राफर व सीसीटीव्ही बसविल्यास सभासदांची अचूक माहिती मिळेल. बोगस मतदानालाही आळा बसेल.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**‘एमपीएससी’ची २१ डिसेंबरची परीक्षा आता ४ जानेवारीला होणार**

पान २ वर..

## आईच्या जातीच्या आधारे मिळाले मुलीला एस.सी. प्रमाणपत्र

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सर्वोच्च न्यायालयाने एका अल्पवयीन मुलीला आईच्या जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे (एस.सी.) प्रमाणपत्र देण्याचा निर्णय दिला. मद्रास हायकोर्टाने दिलेला निकाल कायम ठेवत या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली.

एका अल्पवयीन मुलीला तिच्या आईच्या जातीच्या आधारे एस.सी. प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. शिक्षणाशी संबंधित आवश्यकता लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने हा दुर्मिळ निकाल दिला. पाँडिचेरीतील एका मुलीला तिच्या आईच्या आदि द्रविड जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यास परवानगी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयात वडिलांच्या जातीला मुलाची जात मानण्याच्या परंपरागत नियमाला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका दाखल आहेत. त्यावर अद्याप अंतिम निकाल देण्यात आलेला नाही. अशा स्थितीत आईच्या जातीच्या आधारे जातप्रमाणपत्र देण्याचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या पीठाने मद्रास हायकोर्टाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली. याचिकाकर्त्याने आईच्या जातीच्या आधारे मुलीला एस.सी. प्रमाणपत्र देण्याच्या हायकोर्टाच्या निर्णयाला विरोध केला होता. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, की आम्ही कायद्याच्या प्रश्नाला सध्या बगल दिली आहे. मात्र मुलीच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये.

सरन्यायाधीशांनी म्हटले, की बदलत्या काळात आईच्या जातीच्या आधारे जातप्रमाणपत्र का जारी केले जाऊ नये? सरन्यायाधीशांच्या या विधानामुळे भविष्यात जरी वडिलांची जात वेगळी असेल तरी त्या मुलांनासुद्धा एस.सी. प्रमाणपत्र मिळू शकते ज्यांची आई एस.सी. जातीची आहे.

मुलीची आई हिंदू आदि द्रविड जातीची आहे. तिने तिन्ही मुलांसाठी एस.सी. प्रमाणपत्राची मागणी केली होती. लग्नानंतर पती माझ्या माहेरीच राहतो. मुलेही येथेच शिकले आणि कुटुंबातील सर्वच सदस्य हे अनुसूचित जातीचे आहेत. पण एस.सी. प्रमाणपत्र देताना वडिलांची जात आणि त्यांचा पत्ता हा प्राथमिक आधार मानला जातो.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर कायद्याचा प्रश्न बाजूला ठेवून निकाल दिला. तर सरन्यायाधीशांनी आईच्या जातीच्या आधारे जातप्रमाणपत्र का देऊ नये, असे केलेले विधान हे भविष्यात जात निश्चित करण्याच्या नियमात मोठ्या बदलाची नांदी ठरू शकते. ज्या कुटुंबांमध्ये आई एस.सी., एस.टी. समुदायातून आहे आणि मुले त्याच सामाजिक वातावरणात लहानाची मोठी झाली आहेत त्यांच्यासाठी हा निकाल महत्त्वाचा ठरू शकतो.

## ‘माध्यमिक’च्या पटसंख्येची अट होणार शिथिल

**शिक्षकांना मोठा दिलासा!**

### शिक्षकांअभावी शाळा बंद पडणार नाहीत; समायोजनापूर्वी बदल शक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : इयत्ता नववी व दहावीच्या ज्या वर्गात २० पेक्षा कमी पटसंख्या आहे, तेथील शिक्षकांचे दुसरीकडे समायोजन होणार आहे. १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासन निर्णयामुळे सोलापूर जिल्ह्यातील २२ शाळांसह राज्यातील ६०० हून अधिक शाळा बंद होतील, अशी २०२४-२५ वर्षातील स्थिती आहे. याविरुद्ध शिक्षक व मुख्याध्यापक संघटना आक्रमक झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता पटसंख्येच्या निकषांत बदल केला जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची संचमान्यता डिसेंबरअखेर पूर्ण होणार आहे. सध्या जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका शाळांची पटसंख्या पहिल्यांदा २० डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर पुढील दहा दिवसांत खासगी प्राथमिक शाळांची व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचीही पटसंख्या याच दिवसांत पूर्ण होणार आहे. या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे दुसऱ्या शाळांमध्ये समायोजन होईल.

सुरवातीला त्याच शाळेत, त्याच तालुक्यात, जिल्ह्यात समायोजन होईल. त्यानंतर विभागात आणि शेवटी राज्यात कोठेही त्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होणार आहे. दरम्यान, नववी व दहावीच्या ज्या वर्गातील विद्यार्थी २० पेक्षा कमी आहेत, तेथील शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. या निर्णयात समायोजनापूर्वी बदल होण्याची शक्यता असून त्याचा शासन निर्णय डिसेंबरअखेर अपेक्षित असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

**आठवी ते दहावीपर्यंत तीन शिक्षक**

आठवी ते दहावीच्या वर्गासाठी विज्ञान, गणित व इंग्रजी या तीन विषयांसाठी शिक्षक आवश्यकच आहेत. तीन शिक्षक व एक मुख्याध्यापक अशा शाळांमध्ये आवश्यक आहे. विषय शिक्षक नसतील तर विद्यार्थ्यांना शासकीय शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार नाही. पटसंख्येच्या निकषांमुळे अनेक शाळा बंद पडून शाळाबाह्य विद्यार्थी वाढू शकतात, त्यामुळे पटसंख्येच्या निकषात बदल करावा, असा प्रस्ताव माध्यमिक शिक्षण विभागाने शासनाला पाठविला आहे. त्यानुसार पटसंख्येच्या निकषात बदल होणार आहे.

> “सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार समायोजनाचा शासन निर्णय मागे घेण्यात आला आहे. आता २०२५-२६ ची संचमान्यता अंतिम झाल्यावर समायोजनाची कार्यवाही होईल. पण संचमान्यतेसाठी निश्चित केलेल्या पटसंख्येच्या निकषात बदल करावा, असा प्रस्ताव शासनाला यापूर्वीच पाठविला असून, त्यावर कार्यवाही सुरू आहे.
>
> **- डॉ. महेश पालकर,** संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.




# ‘ एमपीएससी ’ची २१ डिसेंबरची परीक्षा आता ४ जानेवारीला होणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचे निकाल आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) गट ‘ ब ’ची संयुक्त पूर्व परीक्षा एकाच दिवशी म्हणजेच २१ डिसेंबर २०२५ रोजी येत असल्यने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या दोन्ही महत्त्वाच्या घटनांमुळे प्रशासकीय यंत्रणा निकालांमध्ये व्यस्त राहणार असल्याने परीक्षेच्या सुरळीत आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसणार असल्याने आयोगाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत होती. यावर आता अंतिम निर्णयानुसार २१ डिसेंबरची परीक्षा पुढे ढकण्यात आली असून, ती ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

३ डिसेंबर रोजी राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी मतदान झाले. तर २० डिसेंबर रोजी काही नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी मतदान होणार आहे. या दोन्ही टप्प्यांतील



मतदानाचा निकाल २१ डिसेंबर रोजी लागणार आहे. याच दिवशी ‘ एमपीएससी ’ची गट ‘ ब ’ पदांसाठीची संयुक्त पूर्व परीक्षा नियोजित होती. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा निकालांमध्ये व्यस्त राहणार असल्याने परीक्षेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत होती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय), राज्य कर निरीक्षक (एसटीआय) आणि सहाय्यक कक्ष अधिकारी (एएसओ) या पदांसाठी संयुक्त पूर्वपरीक्षा घेतली जाते. यंदा ६७४ पदांसाठी जाहिरात देण्यात आली. यामध्ये सहाय्यक कक्ष अधिकारी ३, राज्य कर निरीक्षक २७९ पदे आणि पोलीस उपनिरीक्षकाच्या ३९२ पदांचा समावेश आहे. सुरूवातीला संयुक्त पूर्व गट ‘ ब ’ २०२५ (अराजपत्रित) परीक्षा ९ नोव्हेंबरला होणार होती. मात्र महाराष्ट्राच्या काही भागांत आलेल्या पूर परिस्थितीमुळे राज्यसेवा परीक्षा पुढे ढकलण्यात आली. ती परीक्षा नोव्हेंबर महिन्यात झाल्याने त्याचा परिणाम संयुक्त पूर्व परीक्षेवर झाला. यानंतर २१ डिसेंबरला संयुक्त पूर्व परीक्षा घेण्याचा निर्णय झाला. आता निवडणुकांमुळे पुन्हा ही परीक्षा पुढे कलावी लागली आहे.

### परीक्षार्थींमधील संभ्रम दूर

**‘ एमपीएससी ’ने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. मात्र आयोगाकडून कोणतीही स्पष्ट माहिती मिळत नसल्याने परीक्षार्थींमध्ये नाराजी पसरली होती. मात्र लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून आयोगाने या प्रकरणी आता कार्यवाही केली आहे.**

# पाली, उंदीर आणि झुरळे... एका रात्रीत होतील गायब!

## कणकेचा गोळा करेल कमाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाली, झुरळे आणि उंदीर एकाच सोप्या पद्धतीने सहज दूर करता येतात? कंटेंट क्रिएटर प्राजक्ताने एक खास कणकेचा गोळा बनविण्याची पद्धत शेअर केली आहे. जी तिन्ही कीटकांपासून मुक्त होण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. पाली, उंदीर आणि झुरळांमुळे घरात मोठा त्रास होतो. ते केवळ घाण पसरवत नाहीत, तर विविध आजारांनाही कारणीभूत ठरतात. लोक अनेकदा महागडे *रासायनिक स्प्रे वापरतात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. पण आता काळजी करण्याची गरज नाही. आम्ही तुम्हाला एक नैसर्गिक आणि सुरक्षित पद्धत सांगत आहोत, ज्याने तुम्ही पाली, उंदीर आणि झुरळे एकाच वेळी दूर करू शकता.

**कंटेंट क्रिएटर प्राजक्ताच्या सोप्या टिप्स**

प्राजक्ताने घरातील सामान्य वस्तू वापरून ही युक्ती तयार केली आहे. यात रासायनिक स्प्रेची गरज नाही आणि लहान मुले किंवा पाळीव प्राणी यांनाही धोका नाही.

**आवश्यक साहित्य**

**१ फिनाइल टॅब्लेट :** हिरवी मिरची (किंवा लाल मिरची पावडर), कापूरची गोळी, झुरळ मारण्याचा खडू किंवा बोरिक पावडर.

२ चमचे गव्हाचे पीठ, थोडे डेटॉल (किंवा फरशी साफ करणारे लिक्विड). गरजेनुसार पाणी.

**पहिली पायरी : पावडर तयार करा**

१) फिनाइल टॅब्लेट आणि कापूरची गोळी बारीक पावडर करा.

२) हिरवी मिरचीचे तुकडे करून बिया काढा (किंवा लाल मिरची पावडर घ्या).

३) यात बोरिक पावडर किंवा झुरळ मारण्याच्या खडूची पावडर मिसळा.

**दुसरी पायरी : कणकेचा गोळा बनवा**

१) गव्हाच्या पिठात थोडे डेटॉल आणि फरशी साफ करणारे लिक्विड घाला.

२) सर्व घटक एकत्र मिसळा.

३) गरज पडल्यास थोडे पाणी घालून पीठ मळा. पीठ खूप मऊ नसावे. पण गोळे बनतील इतके घट्ट असावे.

**वापरण्याची पद्धत**

कणकेचे छोटे-छोटे गोळे बनवा.

हे गोळे त्या ठिकाणी ठेवा जेथे पाली, उंदीर किंवा झुरळे जास्त दिसतात.

स्वयंपाकघरातील कपाटांचे कोपरे फ्रीजच्या मागे जेवण ठेवण्याच्या ठिकाणी

**ही पद्धत कशी काम करते?**


फिनाईल आणि कापूरचा तीव्र वास कीटकांना सहन होत नाही, ते दूर पळतात.

हिरवी मिरचीचा तिखटपणा कीटकांना त्रास देतो.

बोरिक पावडर झुरळे आणि पालींना नष्ट करते.

डेटॉल आणि फरशी क्लीनरचा वास कीटकांना घरात येऊ देत नाही.

गव्हाचे पीठ सर्व घटक एकत्र बांधून गोळा तयार करते.



# डोक्यातील नकारात्मक विचारांमुळे रात्री झोप लागत नाही?

## फक्त करा ५ उपाय, मिळेल शांत झोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वेगाने बदलणारी जीवनशैली आणि धावपळीच्या आयुष्यात अनेकांना निद्रानाशाचा त्रास होतो. बऱ्याचदा रात्री झोपण्यापूर्वी अतिविचार (ओव्हरथिंकिंग) केल्याने झोप लागत नाही. यामुळे सकाळी थकवा जाणवतो. अपुरी झोप आरोग्यावर परिणाम करते. जर रात्री नकारात्मक विचारांमुळे झोप येत नसेल, तर खालील पाच सोप्या उपायांनी शांत झोप मिळू शकते.

**१) झोपण्याची निश्चित वेळ ठरवा**

अतिविचारांमुळे मनाला विश्रांती मिळत नाही. आरोग्यावरही परिणाम होतो. यासाठी दररोज झोपण्याची एक निश्चित वेळ ठरवा. त्याचे नियमित पालन करा. सातत्यपूर्ण झोपेच्या वेळेमुळे शरीर आणि मनाला योग्य विश्रांती मिळते.

**२) स्क्रीन टाइम कमी करा**

मोबाईल, संगणक आणि टेलिव्हिजनचा अतिवापर निद्रानाशाचे प्रमुख कारण आहे. झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी या उपकरणांपासून दूर राहा. स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश डोळ्यांवर आणि मेंदूवर परिणाम करतो. ज्यामुळे झोप लागणे कठीण होते.

**३) चहा आणि कॉफी टाळा**

चहा किंवा कॉफीमधील कॅफिन झोपेच्या चक्रात व्यत्यय आणते. रात्री चहा किंवा कॉफी पिणे टाळा. जेणेकरून तुमचे मन आणि शरीर शांत राहील. झोप सहज लागेल.


**४) योग आणि ध्यानाचा सराव करा**

झोपण्यापूर्वी १० ते १५ मिनिटे योग आणि ध्यान केल्याने मन शांत होते. तणाव कमी होतो. यामुळे नकारात्मक विचार कमी होऊन चांगली झोप लागते. साधे श्वासोच्छ्वासाचे व्यायाम किंवा ध्यानही खूप फायदेशीर ठरते.

**५) दिवसभरातील विचार लिहून काढा**


रात्री नकारात्मक विचार डोक्यात येत असतील, तर दिवसभरातील चिंता किंवा विचार जर्नलमध्ये लिहा. यामुळे मन मोकळे होते. झोपण्यापूर्वी विचारांचा गोंधळ कमी होतो.

नकारात्मक विचार आणि निद्रानाशाचा त्रास टाळण्यासाठी या साध्या उपायांचा अवलंब करा. नियमित दिनचर्या, तणावमुक्त मन आणि योग्य सवयींमुळे शांत आणि गाढ झोप मिळेल.



### मीराबाई चानू ‘ रेल्वेतला किस्सा ’

ऑलिम्पिकनंतर मीराबाई रेल्वेत प्रवास करत होती. एक प्रवासी तिच्या बाजूला मोठी बॅग ठेवत म्हणाला, की थोडे मदत करा ना, जड आहे. ती सहजतेने बॅग वर उचलली. तो म्हणाला, की मॅडम, तुम्ही कोण? ती म्हणाली, की थोडे वजन उचलत असते. कधी-कधी पदकही.



# जर्सी गायीचे दूध तारक की मारक?

जर्सी गायीच्या दुधाबाबत लोकांमध्ये काही गैरसमज आणि काही अंशी वास्तवावर आधारित चर्चा चालतात. यामध्ये वैज्ञानिक माहिती, वैद्यकीय निरीक्षणे आणि लोकपरंपरेतील मते सगळे एकत्र येतात.

**१) जर्सी गाय म्हणजे कोण?**

जर्सी गायी या मूळतः ब्रिटनजवळील बेट येथील जाती आहेत. त्यांचे दूध फॅट (चरबी) व प्रोटीन जास्त असते. पण काही वेळा याचा काही लोकांवर विपरीत परिणाम दिसू शकतो. भारतातील देशी गायींमध्ये बहुतेक ए २ प्रकारचे बीटा-कॅसिन प्रथिन असते, तर जर्सी आणि हायब्रीड गायींच्या दुधात जास्त करून ए १ प्रकारचे बीटा-कॅसिन असते.

**२) ए १ आणि ए २ दुधातील फरक**

ए २ दूध (देशी गाय, गीर, साहीवाल, लाल सिंधी इत्यादी.) पचनास तुलनेने सोपे, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारे मानले जाते. ए १ दूध (जर्सी, होल्स्टीन-फ्रिझियन) पचताना बीटा-कॅसोमॉर्फिन-७ नावाचा पेप्टाइड तयार करू शकते. जो काही अभ्यासांनुसार आतड्यांवर, रोगप्रतिकारक यंत्रणांवर आणि हृदयवाहिन्यासंबंधी आरोग्यावर परिणाम करू शकतो.

**३) संभाव्य घातक परिणाम (जास्त प्रमाणात किंवा दीर्घकाळ सेवन केल्यास) परिणाम/ संभाव्य कारण /निरीक्षण**

- पचनाच्या तक्रारी ए १ प्रथिन आणि बीसीएम-७ फुगणे, अपचन, गॅस, लूज मोशन किंवा बद्धकोष्ठता.
- ॲलर्जी / असहिष्णुता दूधातील प्रथिनावर प्रतिकूल प्रतिक्रिया त्वचेवर पुरळ, खाज, श्वसन तक्रारी.
- श्वसन समस्या, कफ वाढणे, दमा, सायनसिटीस वाढण्याची शक्यता.
- हृदयविकार जोखीम बीसीएम-७ चा दीर्घकालीन परिणाम (काही अभ्यासांनुसार) कोलेस्टेरॉल असंतुलन.
- मधुमेह (टाईप १) जोखीम ए १ प्रथिनामुळे रोगप्रतिकारक यंत्रणेची चूक काही मुलांमध्ये जोखीम वाढल्याची नोंद.
- लठ्ठपणा, उच्च चरबी व ऊर्जा घनता नियमित जास्त सेवनामुळे वजन वाढ.

**४) सर्वांना सारखा परिणाम होतो का?**

नाही. काही लोकांना जर्सी गायीचे दूध सहज पचते. काहींना त्रास होतो. हे व्यक्तीच्या पचनशक्ती, प्रतिकारशक्ती आणि एकूण आहारशैलीवर अवलंबून असते.

**५) आयुर्वेद दृष्टिकोन**

देशी गाय दूध (गीर, साहीवाल) सत्त्ववर्धक, ओजवर्धक, पचनास हलके मानले जाते. जर्सी / हायब्रीड दूध कफवर्धक, गुरू (जड), मंदपाक स्वरूपाचे, त्यामुळे अग्निमांद्य, कफजन्य रोग वाढवू शकते. अशा दुधाचे सेवन करायचे असल्यास हळद, सुंठ, पिंपळी, दालचिनी यांसारख्या दूध-पचवणाऱ्या मसाल्यांसोबत घेणे उपयुक्त ठरते.

**६) काय करावे?**

शक्यतो देशी ए २ दूध वापरावे. जर्सी दूध घेतल्यास गरम करून, मसाला घालून, प्रमाणात सेवन करावे. मुलांमध्ये व वृद्धांमध्ये अत्यधिक सेवन टाळावे. पचनास त्रास, ॲलर्जी किंवा श्वसन तक्रारी असतील तर पर्याय शोधावा.



# दररोज किती प्रमाणात ड्रायफ्रूट्स खावेत?

टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार ड्रायफ्रूट्समध्ये आवश्यक पोषकतत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. याचे दररोज थोडेसे सेवन केल्याने हृदय, मेंदू आणि सामान्य आरोग्यास मोठा फायदा होतो.

ते अधिक प्रमाणात खाणे हे गरजेइतके चांगले नसते, कारण हे कॅलरीने जड असतात आणि त्यामुळे वजन वाढू शकते.

सामान्य आरोग्य असलेल्या प्रौढांमध्ये रोज सुमारे 20-30 ग्रॅम ड्रायफ्रूट्स म्हणजे साधारण एक हातभर इतके पुरेसे असते.

विशेषतः बदाम, अक्रोड, काजू, पिस्ता अशा नट्समध्ये चांगले फॅट्स, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जी हृदय, मेंदू आणि हाडांसाठी उपयुक्त आहेत.

उच्च रक्तदाब, मधुमेह समस्या असलेल्या व्यक्तींनी मात्र स्वतःची परिस्थिती लक्षात घेऊन आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. नट्स आणि ड्रायफ्रूट्सचा समावेश स्नॅक्स, सॅलेड किंवा स्मूदीमध्ये केला जाऊ शकतो. मात्र, प्रमाण आणि वेळ व्यवस्थित ठेवणे महत्त्वाचे आहे. याचे योग्य प्रमाणात सेवन केल्यास ते आरोग्यवर्धक ठरते; परंतु एखादी व्यक्ती खूप प्रमाणात ड्रायफ्रुट्स खाल्ले, तर त्याचे उलटे परिणाम होऊ शकतात. त्यामुळे संतुलन राखणे अत्यंत गरजेचे आहे.

दररोज थोडे ड्रायफ्रूट्स खाल्ले तर शरीराला फायदा होतो, पण प्रत्येकाने आपल्या आरोग्यानुसार किती खायचे ते ठरवायला हवे.



# कॉलेज से निकलते ही फोड़ा यूपीएससी एग्जाम

## २३ की उम्र में अफसर बनी थी बंगाल की बेटी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**

बचपन से ही अधिकारी बनने का सपना था। कॉलेज की पढ़ाई पूरी करते ही अपने सपनों को ताकत दी। यूपीएससी जैसी कठिन परीक्षा को पहले ही प्रयास में पास कर लिया। २३ की उम्र में यूपीएससी में एआयआर-९४ लाकर बंगाल की बेटी अफसर बनी। मेहनत, लगन और सही दिशा में की गई कोशिशें तमाली साहा की सफलता की चमक बिखरेती हैं। तमाली की सक्सेस स्टोरी उन सभी युवाओं को मोटिवेट करती है जो बड़े सपने देखते हैं और उन्हें पूरा करना चाहते हैं।

**यहां से शुरुआतकोलकाता से पढ़ाई**

तमाली साहा पश्चिम बंगाल के उत्तर-२४ परगना जिले की रहने वाली हैं। उनकी शुरुआत पढ़ाई वहीं से हुई। हालांकि, ग्रेजुएशन की पढ़ाई के लिए वह कोलकाता पहुंचीं। जूलॉजी सब्जेक्ट से उन्होंने कोलकाता युनिवर्सिटी से ग्रेजुएशन कंप्लीट किया।

**ऐसे शुरू की यूपीएससी की तैयारी**

तमाली का गोल यूपीएससी ही था और यही वजह है कि उन्होंने ग्रेजुएशन के बाद तैयारी शुरू कर दी। यूपीएससी की तैयारी के लिए उन्होंने सिलेबस और टाइम मैनेजमेंट पर फोकस किया।

**२०२० में दी थी परीक्षा, बन गईं अफसर**

२०२० में उन्होंने उसी साल की यूपीएससी इंडियन फॉरेस्ट सर्विस का एग्जाम दिया था। सही दिशा में मेहनत और फोकस के साथ एग्जाम को क्लियर किया। अपने पहले ही प्रयास में ऑल इंडिया रैंक ९४ हासिल की। २०२१ में वह २३ वर्ष की उम्र में आयएफएस बनीं।

**सिविल सर्विस अफसर बनने का बचपन से था सपना**

तमाली बताती हैं कि हमेशा पढ़ाई में तेज रहीं। बचपन में ही उन्होंने सिविल सर्विस में जाने का मन बना लिया था। देश सेवा की इच्छा और समाज पर सकारात्मक प्रभाव डालने की भावना से प्रेरित होकर वह आगे बढ़ीं।

**आसान नहीं थाप्रेरित करने वाला सफर**

तमाली की सक्सेस जर्नी आसान नहीं थी। उन्होंने सही स्ट्रैटेजी के साथ चुनौतियों से पार पाया। आज उनकी कहानी यूपीएससी की तैयारी करने वालों के लिए प्रेरणादायी है कि अगर मेहनत और फोकस के साथ आगे बढ़ा जाए तो पहले अटेंप्ट में भी यूपीएससी एग्जाम क्लियर किया जा सकता है।



# बाराशे वर्षांपासून न हलणारा दगड

## विज्ञानाची कमाल की दैवी शक्ती ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चेन्नईतील महाबलीपुरममध्ये २० फुट उंच व ५ फुट रुंद दगड ‘कृष्णाचा बटर बॉल’ म्हणून प्रसिद्ध आहे. हा दगड तब्बल ४५ अंशाच्या कोनात बाराशे वर्षांपासून स्थिर आहे. आश्चर्य म्हणजे सात हत्ती एकत्र येऊनही तो हलवू शकले नाहीत. अनेक शास्त्रज्ञांनी त्याच्या संतुलनाचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला. मात्र, यश मिळाले नाही. स्थानिक नागरिकांच्या मते हा दगड भगवान कृष्णाच्या चमत्काराशी जोडला आहे, असे मानले जाते. दरवर्षी हजारो पर्यटक या अद्भुत दृश्याचा अनुभव घेण्यासाठी येतात. निसर्ग, विज्ञान आणि श्रद्धा या तिघांचा संगम या बटर बॉलमध्ये दिसून येतो.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# नाशिकच्या सायकलिंग ग्रुपच्या ‘जय-वीरू’ जोडीचा आध्यात्मिकता अन् सहनशक्तीचा अद्भुत प्रवास

## श्री मंगळग्रह मंदिरास भेटीप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे यथोचित सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जबरदस्त स्टॅमिना आणि अभूतपूर्व सहनशक्ती असलेल्या नाशिकमधील सॅटर्डे-संडे या सायकलिंग ग्रुपची ‘जय-वीरू’ (कैलास भागवत व शिवाजी काकड) ही जोडी मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास येथील श्री मंगळग्रह मंदिरात पोहोचली. त्यांनी श्री मंगळग्रह देवाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे उपाध्यक्ष एस. एन. पाटील व सहसचिव दिलीप बहिरम यांनी यथोचित सत्कार केला. त्यानंतर ‘जय-वीरू’ ही जोडी धुळे मार्गे नाशिककडे मार्गस्थ झाली.




(छायाचित्र : मयूर चौधरी)

नाशिकमधील सॅटर्डे-संडे या सायकलिंग ग्रुपची ‘जय-वीरू’ या जोडीने शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी माहूरगड, शेगाव या दिव्य आध्यात्मिक यात्रेस सायकलिंग करत प्रस्थान केले होते. ते सुमारे १८० किलोमीटरची दमदार सायकलिंग करत सायंकाळी छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचले. तेथे रात्री मुक्कामी थांबले. या मार्गात त्यांनी कोटमगावच्या देवीचे दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी संभाजीनगरहून सुमारे १४० किलोमीटर सायकलिंग करत मेहकर (जि. बुलडाणा) येथे पोहोचले. तेथे रात्री मुक्कामी थांबले. तिसऱ्या दिवशी रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी मेहकर येथून सुमारे १२५ किलोमीटर सायकलिंग करत माहूरगड येथील रेणुका देवीच्या दर्शनासाठी पोहोचले. तेथे रात्री मुक्कामी थांबले. चौथ्या दिवशी सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी सकाळी माहूरगड येथून सुमारे १०५ किलोमीटर सायकलिंग करत गजानन महाराज संस्थान, शेगाव येथ पोहोचले. या पवित्र स्थळी ते मुक्कामी थांबले. तेथून मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी सकाळी शेगावहून सुमारे ९० किलोमीटर सायकलिंग करत दुपारी अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात पोहोचले. ‘जय-वीरू’ ही जोडी दुपारी चारच्या सुमारास नाशिककडे मार्गस्थ झाली. ही जोडी सुमारे २१० किलोमीटर सायकलिंग करत उद्या बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी सायंकाळी नाशिक येथे पोहोचणार आहे.

**सायकलिंग यात्रा फक्त मैलांची नव्हे, तर आत्म्याची!**

याप्रसंगी ‘जय-वीरू’ या जोडीने नतमस्तक होत श्री मंगळग्रह देवाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, की आम्हाला गेल्या काही वर्षांपासून सायकलिंगचा छंद जडलेला आहे. त्या अनुषंगाने सायकलिंग करत विविध आध्यात्मिक ठिकाणांना भेट देतो. तेथील सकारात्मक ऊर्जा ही आमच्या निरोगी आरोग्यासह स्वास्थ्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते. सायकलिंगमुळे वजन न वाढता शरीर लवचिक होऊन वजन कमी होते. त्यामुळे साहजिकच शारीरिक व्याधी नष्ट होतात. सायकलिंगमुळे कधीच थकवा जाणवत नाही, तर उलट मोठे समाधान लाभते. ही सायकलिंग यात्रा फक्त मैलांची नव्हे, तर आत्म्याचीही आहे.

# बेशिस्तीने रिक्षा लावल्याप्रकरणी चालकावर पोलिसात गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- येथील बस स्थाननकासमोरील मुख्य रस्त्यावर सुनील सदाशिव पाटील या रिक्षा चालकाने वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, अशी रिक्षा उभी केली होती. याप्रकरणी वाहतूक शाखेचे पोलिस कॉन्स्टेबल रवींद्र बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रिक्षा चालक सुनील पाटील यांच्यावर येथील पोलीस ठाण्यात मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत श्री. बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की आज दुपारी अडीच वाजेच्या सुमारास पोलीस हेड कॉन्स्टेबर विनय बाळू पाटील, संजय रमेश बोरसे यांच्यासह मी गस्तीवर होतो. यावेळी बस स्थानकासमोरील रस्त्यावर ऑटो रिक्षा (एमएच१५ झेड १७४४) ही बेशिस्तीने उभी होती. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. अपघाताचीही शक्यता होती. त्याअनुषंगाने रिक्षा चालक सुनील पाटील (वय ४७, रा. शिरूड नाका, अमळनेर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# महसूल विभागाने विविध कामांसाठी लागणारे प्रतिज्ञापत्र पूर्ववत सुरू करावे

## शिवसेनेतर्फे प्रांताधिकारी, तहसीलदारांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील तहसील कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून प्रतिज्ञापत्र स्वीकारण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. हे प्रतिज्ञापत्र पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी प्रांताधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन दिले आहे.




निवेदनात म्हटले आहे, की नागरिकांना विविध कामांसाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, नामांतराची प्रक्रिया, वारस नोंद आदींसाठी महसूल विभागात प्रतिज्ञापत्र सादर करावे लागते. मात्र, ही प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजना, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनी, शेतकरी, बँकींग आदी कामांसाठी मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. महसूल विभागाने प्रतिज्ञापत्र तातडीने पूर्ववत सुरू करावे. आवश्यक असल्यास संबंधित नियमावलीबाबत मार्गदर्शक सूचना नागरिकांसाठी जाहीर करण्यात याव्यात. याबाबत तत्काळ निर्णय घ्यावा. नागरिकांना दिलासा द्यावा. निवेदनाच्या प्रती पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, जिल्हाधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, शहरप्रमुख संजय पाटील, शेतकरी संघटनेचे श्यामकांत पाटील, गुलाम नबी करीमखाँ, नाविद शेख, भूषण कोळी, अनिल पवार आदींच्या सह्या आहेत.

## सावधानतेची जाहीर नोटीस

१) सिताराम यंत्रमाग विणकर सहकारी संस्था मर्या. अमळनेर उत्कर्ष नगर, धुळे रोड, अमळनेर जि. जळगाव
२) श्रीमती विमल नरेंद्र पाटील रा. उत्कर्ष नगर, प्लॉट न.५ पूजा ऑइल मिल जवळ, अमळनेर जि. जळगाव
३) श्री. मधुसूदन नरेंद्र पाटील रा. उत्कर्ष नगर, प्लॉट न.५ पूजा ऑइल मिल जवळ, अमळनेर जि. जळगाव
४) श्री. अमोल नरेंद्र पाटील रा. उत्कर्ष नगर, प्लॉट न.५ पूजा ऑइल मिल जवळ, अमळनेर जि. जळगाव
५) शिल्पा नरेंद्र पाटील उर्फ शिल्पा भूपेश गावडे रा.द्वारा श्रीमती विमल नरेंद्र पाटील, उत्कर्ष नगर, प्लॉट न. ५ पूजा ऑइल मिल जवळ, अमळनेर जि. जळगाव

**यांना व तमाम जनतेस, बँका, पतसंस्था व इतर वित्तीय संस्था व शासकीय कार्यालय व विभाग यांना या जाहीर नोटीसी द्वारे विशेष वसुली अधिकारी, दि अमळनेर को-ऑप. अर्बन बँक लि. अमळनेर जि. जळगाव यांचे तर्फे कळविण्यात येते की,**

१ सिताराम यंत्रमाग विणकर सहकारी संस्था मर्या, अमळनेर ही नोंदणीकृत सहकारी सोसायटी असून, तिने आमच्या बँकेकडून घेतलेले कर्ज थकविलेले आहे. कै. नरेंद्र सिताराम पाटील हे सदर सोसायटीचे चेअरमन होते व त्यांनी सोसायटीच्या कर्जासाठी वैयक्तिक जामीन की स्वीकारलेली होती. नोटीस घेणार क्रमांक २ ते ५ हे कै. नरेंद्र सिताराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहे. सिताराम सोसायटीने बँकेकडून घेतलेले कर्ज थकबाकी केल्यामुळे बँकेने त्यांचे वसुलीसाठी सिताराम सोसायटी व नोटीस घेणार क्रमांक २ ते ५ यांचे विरुद्ध सहकार न्यायालय जळगाव येथे दावा दाखल केला होता. सदर दाव्याच्या निकाल झाल्यानंतर बँकेने त्याविरुद्ध मा. महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अपील दाखल केले होते व सदर अपिलाचा निकाल दिनांक १/११/२०२५ रोजी आमच्या बँकेच्या वतीने लागलेला असून, त्याद्वारे सिताराम सोसायटी तसेच नोटीस घेणार क्रमांक २ ते ५ यांचे विरुद्ध त्यांनी बँकेला रु. ७३,१७,७८५/- तसेच सदर रकमेवर दि. ३१/०१/२०१६ पासून १५% दराने होणारे संपूर्ण व्याज अदा करण्याचा निकाल बँकेच्या लाभात झालेला आहे. तसेच बँकेला कर्ज वसुलीसाठी प्लॉट नंबर ९४ ते ९७, गट नंबर ८८३/१ अंमळनेर जिल्हा जळगाव तसेच प्लॉट नंबर ५ गट नंबर १४९९/२, प्लॉट नंबर ५३ गट नंबर १८०९ व गट नंबर १२८ अमळनेर जिल्हा जळगाव या मिळकती विक्री करण्याचा हक्क आहे, असा निकाल झालेला आहे.

2) सिताराम सोसायटी तसेच नोटीस घेणार २ ते ५ यांनी वरील प्रमाणे मा. कोर्टाचा बँकेच्या लाभात निकाल होऊनही कर्जाची परतफेड केलेली नाही व त्यामुळे नाईलाजास्तव बँकेला वर नमूद मालमत्ता विक्री करण्याची कारवाई कायद्यानुसार करणे क्रमप्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे तरतुदीनुसार मा. सहकार न्यायालयाने कर्जदार व इतर जबाबदार व्यक्ती यांच्याविरुद्ध रक्कम परतफेडीचा आदेश केल्यानंतर अशा व्यक्तींना त्यांच्या कोणत्याही मालमत्ता बँकेच्या संमतीशिवाय हस्तांतर अथवा इतर कोणताही व्यवहार करता येत नाही. वरील परिस्थितीत नोटीस घेणार यांच्या वर नमूद तसेच इतर कोणत्याही मालमत्ता हस्तांतर अथवा इतर कोणत्याही मार्गाने कोणताही व्यवहार करण्याचा अधिकार नोटीस घेणार यांना राहिलेला नाही.

३ तरी वरील परिस्थितीत नोटीस घेणार यांना व तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, नोटीस घेणार व्यक्तींनी त्यांच्या वर नमूद अथवा त्यांच्या अन्य कोणत्याही इतर मालमत्तेबाबत कोणाशीही कोणताही व्यवहार अथवा लेखी दस्तऐवज इ. करू नये. तसेच तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, नोटीस घेणार व्यक्तींशी कोणीही त्यांच्या वर नमूद अथवा त्यांच्या अन्य कोणत्याही इतर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार अथवा लेखी दस्तऐवज इ. करू नये. अन्यथा सदर व्यवहार बेकायदेशीर व रद्दबातल असेल व आमच्या बँकेवर बंधनकारक असणार नाही.

**विशेष वसुली अधिकारी,**
**दि अमळनेर को-ऑप. अर्बन बँक लि.**

# अवैध वाळू वाहतुकीच्या वाहनांमुळे मंगरुळ- ढेकू रस्त्याची दयनीय अवस्था

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील मंगरूळ ते ढेकू सुमारे चार किलोमीटरच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे या रस्त्याचे तीन- तेरा वाजले आहेत. हा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. याबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून, लवकरात लवकर नवीन रस्ता करावा, अशी मागणी केली आहे.

या रस्त्यावर रात्री वाळूने भरलेले डंपर, ट्रॅक्टर, ट्रॉली आदी अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये- जा सुरू असते. त्यामुळे रस्त्यावर खोल खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून चालणेही मुश्किल झाले आहे. प्रवाशांना वाहन चालविणे कठीण झाले आहे.





# पवन शिंपी याची राष्ट्रीय कुस्तीसाठी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील प्रताप महाविद्यायातील विद्यार्थी व जय हिंद व्यायामशाळेचा पहिलवान पवन प्रताप शिंपी याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. धुळे येथील क्रीडा संकुलात रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धा झाल्या. अंतीम सामन्यात जामनेरच्या कुस्तीपटूवर विजय मिळवून पवन शिंपी याने ७९ किलो वजन गटात विजय मिळविला. पुढील महिन्यात चंदीगड येथे होणाऱ्या अ. भा. आंतर विद्यापीठ स्पर्धेत तो सहभागी होणार आहे.

त्याच्या विजयाबद्दल राजे शिवाजी मित्र मंडळ व जय हिंद व्यायाम शाळेच्या पदाधिकारी, सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

# श्रीसंत संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त अमळगावला प्रतिमापूजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील अमळगाव येथे सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी ग्रामपंचायत, ग्रामीण रुग्णालय, शाळा आदी विविध ठिकाणी श्रीसंत संताजी जगनाडे महाराज जयंती उत्साहात झाली. यावेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

समस्त तेली कल्याणकारी बहुद्देशीय संस्थेतर्फे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालयात लोकनियुक्त सरपंच गिरीश पाटील यांनी प्रतिमापूजन केले. याप्रसंगी सदस्य गोविंदा चावरे, संजय चौधरी, नरेंद्र चौधरी, पोलीस पाटील राहुल ठाकरे, विलास चौधरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिमापूजन केले. संस्थेच्या कार्यालयात जयराम चौधरी यांनी प्रतिमापूजन केले. चंद्रशेखर चौधरी अध्यक्षस्थानी होते. शिवाजी चौधरी, प्रदीप चौधरी, सुभाष चौधरी, नीलेश चौधरी, प्रवीण चौधरी, महेंद्र चौधरी, महाराष्ट्र प्रदेश तेली महासंघाचे सचिव परेश चौधरी, उपाध्यक्ष भूषण चौधरी तसेच समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदर्श माध्यमिक विद्यालयात झालेल्या कर्यक्रमात श्याम पाटील अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भूषण चौधरी प्रमुख वक्ते होते. यावेळी प्राचार्य पी. जे. देवरे, माजी मुख्याध्यापक एन. एल. सोनवणे आदी उपस्थित होते. ए. जी. बैसाणे यांनी सूत्रसंचालन केले.



ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# उल्कामुख व गणपतीबाप्पा यांचे युद्ध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पृथ्वीवर उल्कामुख नावाचा एक सार्वभौम राजा होता. त्याने एकदा सर्व सैनिकांना एकत्र केले व रथात बसून तो युद्धभूमीवर जाण्यासाठी निघाला. वीस लाख घोडेस्वार, एक कोटी धनुष्यधारी व पन्नास लाख हत्ती, तसेच अगणित पायदळ घेऊन तो रणवाद्यांच्या गजरात येऊन दाखल झाला. तेव्हा इंद्राला भीतीने मोठे कापरे भरले. तो धावत-पळत भगवान शंकर यांच्याकडे गेला आणि उल्कामुख आल्याचे वर्तमान निवेदन केले. त्यावर भगवान शंकर नुसते हसले व इंद्राला अभय देऊन गणपतीबाप्पांकडे पाहून त्याला युद्धासाठी जाण्यास सांगितले. गणपतीबाप्पांनी त्वरित सैन्य गोळा केले आणि भंडारा (हळदीचे चूर्ण) उधळीत ते रणभूमीवर जाऊन पोहोचले. तेव्हा उल्कामुख व गणपतीबाप्पा या दोघांनी वीरश्रीयुक्त भाषणे केली. दैत्याने सर्व देवता, इंद्र व भगवान शिव यांची यथेच्छनिंदा केली. ती ऐकून गणपतीबाप्पा चवताळले व त्यांनी एकदम युद्धास आरंभ केला.



दैत्याने बाणांचा वर्षाव केला तेव्हा गणपतीबाप्पांनी फक्त दहाच बाणांत त्यांचे निवारण केले, तेव्हा संतापाने उल्कामुखाने बाणांचा असा पाऊस पाडला, की गणपतीबाप्पा ज्या रथात होते त्याचा सारथी व घोडे जखमी होऊन कोसळले. दैत्याच्या युद्धकौशल्याने देवांच्या सैन्यात हाहाकार माजला व पळापळ चालू झाली. तेव्हा गणपतीबाप्पांनी रागारागाने असा जोराचा हल्ला केला, की दैत्यसेना वाट दिसेल तिकडे पळत सुटली. त्याने सात बाणांनी दैत्याला बेशुद्ध केले.

उल्कामुख जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा तो पाहतो तर त्याच्या सैन्याचा पत्ताच नव्हता व रणांगणावर तो एकटाच होता. मग त्याने उठून व अंतराळात उड्डाण करून गणपतीबाप्पांच्या मस्तकावर प्रचंड अशा गदेचा प्रहार केला. ती गदा गणपतीबाप्पांनी परशूने तोडली तेव्हा त्या दैत्याने एक महासंहारक शक्ती हाती घेतली न घेतली तोच गणपतीबाप्पांनी ती दाताने तोडली व उल्कामुखावर वज्रमुठीचा घाव घातला. दैत्याला क्षणभर तिरीमिरी आली; पण क्षणार्धात स्वतःला सावरून त्याने नरसिंहाचे रूप घेतले आणि गणपतीबाप्पांच्या गंडस्थळावर उडी घेऊन नखांनी त्यांची लांबलचक सोंड ओरबाडली.

ती संधी साधून गणपतीबाप्पांनी आपला एक सुळा त्याच्या हृदयात जोराने खुपसला आणि उल्कामुख गतप्राण होऊन खाली कोसळला. मग गणपतीबाप्पांनी सर्व मृत देवसैनिक जीवंत केले व ते वाद्यांच्या गजरात शिवसभेत गेले व सर्व वृतांत कथन केला. सर्व देव ऋषी आनंदित झाले.

तिकडे मल्लाला उल्कामुख पडल्याचे हेरांकडून कळले तेव्हा सर्व सभेवर शोककळा पसरली. मल्लासूर तर दुःखाने व रागाने जणू काही वेडापिसा झाला. तेव्हा मणि प्रधान पुढे झाला व मल्लासुराचे सांत्वन करून म्हणाला, की अरे काळचक्राच्या फेऱ्यामध्ये हारजीत ही असणारच. पण दुःख करीत बसणे ही शूरांची रीत नव्हे व तो त्यांचा धर्मही नाही. लढता-लढता जिंकून सुख भोगावे अगर मरून परलोकी सुखी व्हावे हे दैत्यांचे कर्तव्य आहे. तेव्हा नव्या जोमाने युद्धाची तयारी करू लाग. असे ऐकून 'कुंतलोमा' नावाचा महापराक्रमी दैत्य दंड थोपटून उभा राहिला व त्याने दैत्यांचे सैन्य घेऊन सगळ्या देवांना व इंद्राला ठार करून येतो, अशी गर्जना केली. तेव्हा मल्लाला मोठा आनंद वाटला व त्याने कुंतलोमा याला सर्व अधिकार बहाल केले व सेनापती म्हणून अभिषेक केला.

# देवाला नैवेद्य समर्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेक घरांमध्ये स्वयंपाक झाला, की देवाला नैवेद्य दाखवायची प्रथा आहे. काही घरांत किमान सणासुदीला तथा मंगलकार्याप्रसंगी नैवेद्य दाखवितात. आपण देवाला नैवेद्य दाखविताना आधी पाण्याचा एक चौकोन काढतो. मग त्यावर ताट देवासमोर ठेवतो. मग खालील मंत्र म्हणून एक-एक घास ५ वेळा देवाला भरवतो. मग दोनदा ताटाभोवती पाणी फिरवतो.

**ॐ प्राणाय स्वाहा।**
**ॐ उदानाय स्वाहा।**
**ॐ समानाय स्वाहा।**
**ॐ व्यानाय स्वाहा।**
**ॐ अपानाय स्वाहा।**
**नैवेद्यं समर्पयामि॥**
**किंवा ब्रह्मणे स्वाहा॥**

असे म्हणून नैवद्यामध्ये पाणी समर्पयामी म्हणत पाणी सोडतो.

हे आपण पूर्वापार करत आलो आहोत. पण असे करण्यामागे मुख्य कारण काय आहे? मी याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मला जे माहिती झाले ते मी तुमच्याजवळ व्यक्त करतो. नुसते अंधानुकरण नको. नैवेद्य देवाला रोज दाखवावा. जितक्या वेळा आपण अन्न ग्रहण करतो तितक्या वेळा आपल्यामध्ये असणाऱ्या चैतन्य स्वरूपाला दाखवावयाचा आहे.

पूर्वी मातीच्या जमिनी शेणानी सारवलेल्या असायच्या. त्यामुळे जेवायला बसण्याअगोदर साधारण ताट राहील एवढ्या चौकोनाला पाणी फिरवून जागा साफ करायची. ताटाभोवती रांगोळी काढायची. कारण काही जीवजंतू त्याच्या आजूबाजूला फिरू नयेत म्हणून. कारण रांगोळीच्या या खरखरीतपणावर जीवजंतूंना चालायला अवघड जाते. मग जेवणाचे ताट मध्ये ठेवून भोवती पाणी फिरवायचे. कारण वाट चुकून आलेला एखादा जीवजंतू ताटापर्यंत येऊ नये म्हणून. आता या ताटाचा नैवेद्य हा आपल्या देहात असलेल्या परमेश्वराला दाखवायचा आहे. कोणत्या मूर्तीला किंवा फोटोला नाही. आपले शरीर हे पंचतत्त्वांनी बनलेले आहे. त्या पाचही तत्त्वांचे नाव घेऊन आपल्या शरीरात उत्पन्न झालेल्या जठराग्नीला अन्नाची आहुती द्यायची आहे, म्हणजेच एक-एक घास भरवायचा आहे. या पाचही तत्त्वांची विशिष्ट जागा आहे.

- प्राण म्हणजे वायू त्याची जागा आहे.
- नाक, तोंड उदान (पाणी) याची जागा आहे.
- कंठ समानाय (अग्नी) याची जागा.
- नाभी व्यानाय (आकाश ) याची जागा सर्वांगात आहे.
- आणि अपानाय (पृथ्वी )ची जागा गुदद्वार.

अशा तऱ्हेने तोंडापासून सुरू होणारी पाचनक्रिया मलमूत्र विसर्जनापर्यंत पोहोचते. अन्नग्रहण ते विसर्जन हे सर्व कार्य निर्विघ्न पार पडावे, यासाठी हे मंत्रोच्चार आहेत.

**ॐ प्राणाय (वायू)स्वाहा।**
**ॐ उदानाय (पाणी) स्वाहा।**
**ॐ समानाय (अग्नी) स्वाहा।**
**ॐ व्यानाय (आकाश) स्वाहा।**
**ॐ अपानाय (पृथ्वी) स्वाहा।**
**नैवेद्यं समर्पयामि ॥**

हा मंत्र आपण दोनदा म्हणतो. याचे कारण असे आहे ताटात वाढलेला पदार्थ संपला, की आपण पुन्हा वाढतो ना किंवा घेतो ना? तर दुसऱ्यांदा मंत्राचा उच्चार ही विचारणा आहे, अजून काही हवे का? अशी. आणि सरतेशेवटी आपण नैवेद्यात पाणी सोडतो म्हणजे आता काही नको. जेवण पूर्ण झाले. भोजन करणे हा एक यज्ञ आहे. आता मला सांगा अंधानुकरण करत आपण आपल्या शरीरात सदैव राहणाऱ्या भगवंताला उपाशी ठेवत होतो इतके दिवस. **हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी हा भगवंत** आहे म्हणून आपले अस्तित्व आहे. आपण करत नसलेल्या अनेक क्रिया तो करत असतो. आपल्या श्वासांमध्ये तो आहे. अन्न खाणे, पचन, पचलेल्या अन्नाचे



पोषणासाठी लागणारे घटक तयार करणे, त्यातन रक्तनिर्मिती आणि त्याला संपूर्ण शरीराला पोहोचवणे आणि नको असलेल्या घटकांना मलमूत्राद्वारे बाहेर फेकणे या पाच क्रियांसाठी लागणारी उष्णता म्हणजे यज्ञ. या हवनासाठी लागणारा मुख्य घटक म्हणजे आपले अन्न. अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे. त्याचा आदर केला पाहिजे. ताटात अन्नाचा एकही कण वाया घालवू नका. आपण जेवणाच्या आधी हा श्लोक म्हणतो.

**वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे।**
**सहज हवन होते नाम घेता फुकाचे।**
**जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म।**
**उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म॥**

अन्न ग्रहण करणे म्हणजे फक्त पोट भरणे नाही. त्यामुळे जेवताना आपण प्रसन्न असावे. आजूबाजूचे वातावरणही प्रसन्न असावे कारण हा एक यज्ञ आहे.

एकदा जगद्गुरु शंकराचार्यांना एका व्यक्तीने प्रश्न केला, देवाला नैवेद्य का दाखवायचा आम्ही जो नैवेद्य दाखवतो, त्यातील काहीही देव खात नाही. ना ही त्या पदार्थात कुठला बदल होतो. मग नैवेद्य कशासाठी? नैवेद्य हे थोतांड नाही का? शंकराचार्य जराही विचलित झाले नाहीत. त्यानी शांतपणे उत्तर दिले.

"जेव्हा कोणी एक व्यक्ती देवाला नैवेद्यासाठी पेढे घेऊन जातो, तेव्हा रस्त्यात कुणी भेटला तर त्याला तो काय सांगतो ? हे पेढे माझे आहेत, मी आणलेय देवासाठी." पण तेच पेढे जेव्हा तू नैवेद्य दाखवून आणतोस, तेव्हा कुणी विचारलेस तर तू काय सांगतोस... "हा देवाचा प्रसाद आहे, हा प्रभू श्रीरामचंद्र यांचा प्रसाद आहे, हा हनुमानजींचा प्रसाद आहे." हे माझे नाही, तर परमेश्वराचे आहे... ही भावना मनात रुजू होते.

हीच तर सगळ्यात मोठी गोष्ट आहे. त्या प्रसादाने तुझ्यातला "मी" बाहेर फेकला गेला. परमेश्वराला नैवेद्य दाखवल्याने माणूस त्याच्यापुढे नत मस्तक होतो. अहंकार- रहित होतो.

स्वच्छ आणि निर्मल मनाची त्याला अनुभूती येते, हेच महत्व आहे नैवेद्य आणि प्रसाद यांचे. म्हणूनच नेहमी घरात काहीही गोड धोड केले की, सणासुदीला देवाला नैवेद्य दाखवण्याची प्रथा अपल्या संस्कृतीत आहे.

# हिरण्यमयी महालक्ष्मी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आई वात्सल्याची मूर्ती असते. पण आपल्या मुलांना त्रास देणाऱ्या दुष्ट शक्तींचा बीमोड करण्यासाठी उग्र रूप धारण करते. अशीच कथा आहे करवीर निवासिनी महालक्ष्मी देवींची. पुरातन काळी कोल्हासूर नावाच्या राक्षसाने करवीर क्षेत्राला सळो की पळो करून सोडले होते. राक्षसाने अनाचार माजविल्याने जनता त्रस्त झाली होती. कोल्हासुराच्या बलापुढे देवही हतबल झाले होते. सगळ्यांनी मिळून महालक्ष्मीची आर्त प्रार्थना केली. तिने अवतरीत होऊन कोल्हासूराचा वध केला. मृत्यू समयी देवीला शरण जात या क्षेत्राला आपले नाव मिळावे, असा कोल्हासूराने वर मागितला. देवीने वर देताच त्याच्या मुखातून दिव्य तेज निघून महालक्ष्मी देवींच्या मुखात शिरले आणि या स्थानाला कोल्हापूर हे नाव मिळाले. कोल्हासूर वधाचा, आई महालक्ष्मींसह ऋषीमुनी देव-देवता या साऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. पण महालक्ष्मी देवी आपली बहीण त्र्यंबोली हीस आमंत्रण देण्याचे विसरल्या. म्हणून त्र्यंबोली देवी रुसून पूर्वेकडील टेकडीवर जाऊन बसली. तिची समजूत काढण्यासाठी महालक्ष्मी देवी अश्विन शुद्ध पंचमीला तेथे गेल्या. आजही नवरात्रात हा त्र्यंबोली देवी व महालक्ष्मी देवी यांच्या भेटीचा सोहळा होतो. कोल्हासुराचे प्रतीक म्हणून कोहळ्याचा भेद केला जातो.

असे हे प्राचीन करवीर निवासिनी महालक्ष्मी देवींचे क्षेत्र पुराणातील १०८ शक्तिपीठांपैकी आणि महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण शक्तीपीठ आहे. पूर्वी कोल्हापूर येथील नागरी वस्ती पंचगंगेच्या काठी ब्रह्मपुरी टेकडीनजीक वसलेली होती. महालक्ष्मी देवींचे मंदिर गावाबाहेर दाट झाडीमध्ये वसलेले होते. इसवी सन ६३४ मध्ये चालुक्य राजा कर्णदेव याने मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख आहे. म्हणजे त्याच्याही आधी हे मंदिर अस्तित्वात होते. पुराणे, ग्रंथ, ताम्रपत्रे व उपलब्ध असणारी कागदपत्रे यातून देवी महालक्ष्मींचे आणि मंदिराचे प्राचीनत्व सिद्ध होते.

हेमाडपंथी वास्तुकलेने नटलेले हे देवालय अनेक वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे प्रसिद्ध आहे. मंदिराच्या बांधकामात चुन्याचा वापर केलेला नाही. घडीव दगड एकमेकांत अडकवून मंदिर उभारले आहे. पश्चिमाभिमुख असलेले हे मंदिर दिशासाधन तंत्र वापरून बांधले आहे. त्यामुळे वर्षातून दोन वेळा किरणोत्सव सोहळा होतो. ३० जानेवारी एक व दोन फेब्रुवारी, ९,१०,११ नोव्हेंबर या दिवशी सूर्यकिरणे अनुक्रमे देवीच्या पायावर, पोटावर व संपूर्ण अंगावर पडतात.



हा किरणोत्सव पाहण्यासाठी भक्तांची अलोट गर्दी असते. मावळतीच्या सोनसळी किरणांनी अभिषिक्त झालेली आई महालक्ष्मी देवींची मूर्ती अतिशय नयनरम्य दिसते. महालक्ष्मी देवींची मूर्ती नागमुद्रा धारण केलेली आहे. तिच्या मस्तकावर नागाने आपला फणा धरला आहे. देवी चतुर्भुज असून हातांमध्ये गदा, ढाल, पानपात्र आणि महाळूंग धारण केले आहे. मस्तकावर लिंग योनी आहे. मूर्ती स्थानक प्रकारातील म्हणजे उभी आहे. डाव्या बाजूला सिंह आहे. मंदिर दुमजली आहे. महालक्ष्मीच्या गर्भगृहाबरोबर वर दुसऱ्या मजल्यावर मातृलिंग आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एकमेव मंदिर दुमजली आहे. तसेच महालक्ष्मी देवींच्या गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणा मार्ग आहे. ही पण एक वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे.

मंदिरात बाहेरच्या भिंतीवर अप्रतिम कोरीव काम केलेली शिल्पे आहेत. आईची मूर्ती सुद्धा कलाकुसरीने विनटलेली आहे. अतिशय प्रसन्न आणि शांतमुद्रा असलेल्या आई अंबाबाई महालक्ष्मी देवींचे दर्शन घेतल्यावर अतीव समाधान मिळते.

# कदलीवन : हनुमान साधनेचे परमपवित्र, परमश्रेष्ठ व परमगोपनीय स्थान

कदलीवन हा शब्द कानावर जरी पडला तरी मनात किती किती गोष्टी रुंजी घालू लागतात. कदलीवन म्हणजे कर्दळीवन की केळीवन, काहीही असले तरी त्याचा अनुबंध हा शेकडो सिद्ध संतांसोबत आहे. प्रत्यक्ष भगवान महादेव व त्यानंतर श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज, श्री स्वामी समर्थ, अक्कमहादेवी अशा विभूती कदलीवनासोबत जोडलेले आहेत. कदलीवन हे श्रीशैल्य क्षेत्र! काहींच्या मते, असे कदलीवन गंगेच्या मैदानी क्षेत्री हिमालय पायथ्यासमीप आहे. काहीही असले तरी कदलीवन हे विचार प्रवर्तक आहे हे नक्की! विचार करायला लावणारी घटना घडली ती अशी...

यंदा दसऱ्याच्या आदल्या रात्री कोकणातील आमच्या गावी बावीस वर्षांचा तरुण रात्री दीड वाजता घाबरलेला आमच्या घरी धावत आला. त्याला गेली काही दिवस सतत एकाच प्रकारचे स्वप्न पडत होते. त्याला सतत स्वप्नात एक प्रचंड वानर येऊन ' केळीच्या बागेत ये आणि भेट ' असे म्हणत होते. तो तरुण आमच्या गावातला होतकरू तरुण! आमचे बोलणे झाले आणि मग त्याने स्वप्न आले, की उठून केळी बागेत जायला सुरूवात केली. त्याने सांगितलेली ती पहिली रात्र मी कधीही विसरू शकत नाही. त्या रात्री त्याने गावाबाहेरची एक जुनी, दाट केळीची बाग निवडली. तेथे एकटाच गेला. फक्त एक दिवा आणि हनुमान स्तोत्रांचे पुस्तक घेऊन गेला. रात्री अडीच वाजता त्याने जप सुरू केला. अवघ्या अर्ध्या तासात त्याला प्रथम अनुभव आला. संपूर्ण बागेतून प्रचंड प्रकाशझोत बाहेर पडत होता, पण तो डोळ्यांना दिसत नव्हता, हृदयाला जाणवत होता. नंतर त्याला वाऱ्याबरोबर ' राम राम ' चा उच्चार ऐकू आला. शेवटी त्यांनी प्रत्यक्ष पाहिले, की प्रचंड हनुमानजी-रूप बागेच्या मधोमध उभे होते. मात्र ते रूप केळीच्या झाडांसारखेच हिरवेगार आणि कोमल होते. त्या रात्रीपासून त्यांचे जीवन बदलले. आजही ते म्हणतात, की ' दलीवनात हनुमानजींना शोधायची गरज नाही; तेथे हनुमानजी तुझ्या शोधात असतात. ही काही एकच गोष्ट नाही. अशा हजारो गोष्टी आहेत. कोकण, केरळ, तमिळनाडू, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आजही जीवंत आहेत. पण या साऱ्यांचे मूळ एकच : कदलीवनाचे रहस्य! केळीची बाग काहीतरी खास आहे.

**१) पराशर संहिता :** चरति खलु यत्र कदलीवनं समृद्धं
तत्र वसति सानुकूलता पवनसूनोः ।
नात्र संशयो मित्रं यत्र कदलीद्रुमाः सुंदराः
तत्र हनूमतः प्रीतिः सहस्रगुणिता भवेत् ॥

(जेथे समृद्ध केळीचे वन असते तेथे पवनपुत्रांची अतीव अनुकूल उपस्थिती नेहमी संचार करते, यात संशय नाही. जेथे सुंदर केळीचे झाड असतात तेथे हनुमानजींची प्रीती हजारपटीने अधिक असते.)

**२) आनंद रामायण :** कदलीवनामध्ये हनुमानजींनी सीता मातांची खूप शोधाशोध केली होती. तेथेच त्यांना सीता मातांच्या दुःखाची तीव्रता जाणवली होती. म्हणून ते स्थान त्यांना फार प्रिय झाले.

**३) भुसुंडी रामायण :** काकभुसुंडी गरुडाला सांगतात, की ' ज्या ठिकाणी केळीच्या पानांचा सळसळाट आहे तेथे माझे हनुमानजी नेहमी उपस्थितअसतात. '

**४) अद्भुत रामायण :**
महर्षी वाल्मिकी लिहितात, की ' कदलीवनं हनुमतः परमं प्रियं स्थानम् ।'

**५) तंत्रराज तंत्र (रुद्रयामल) :** हनुमान-मंत्र-सिद्धीच्या वेळी ' कदलीवन-मध्यसंस्थितं हनुमंतं ध्यायेत् ' असे सांगितले आहे.

**६) मडि हनुमान उपासना पद्धती (केरळ) :**
केरळातील अनेक प्राचीन हनुमान मंदिरांत मूर्तीच नसते. फक्त एक प्राचीन केळीचे झाड असते. त्या झाडाला ' मडि हनुमान ' म्हणतात. तेथे ४१ दिवस केळीच्या बागेत राहून साधना केली, की ' प्रत्यक्ष दर्शन ' हमखास मिळते, अशी श्रद्धा आहे. केळीचे झाड आणि हनुमान-तत्त्व यांचे अद्वितीय साम्य हा विषय गहन असा आहे. केळीचे झाड हे केवळ झाड नाही; ते एक जीवंत यंत्र आहे, जीवंत मंत्र आहे, जीवंत देवता आहे. त्याचे प्रत्येक अवयव हनुमानजींच्या स्वरूपाशी इतके एकरूप आहे, की तंत्रशास्त्रात याला ' हनुमत्-स्वयंभू-रूप ' म्हटले जाते.

**१) खोड-** मऊ बाहेरून, मजबूत आतून. हनुमानजींचे मन दास्यभावाने अतीव कोमल, पण प्रभू श्रीराम-संकल्पात अटल. तेच केळीचे खोड.
**२) पाने-** सतत सळसळणारी.वायुतत्त्वाशी सतत संवाद. पानांचा सळसळाट हाच ' राम-नाम ' चा उच्चार असतो.
**३) एकदाच फळ देऊन मृत्यू.** - निःस्वार्थ अर्पण. हनुमानजींनीही आयुष्य प्रभू श्रीरामांसाठी एकदाच, पूर्णपणे अर्पिले.
**४) लाल रस.** - झाड कापले की रक्तासारखा लाल रस बाहेर पडतो. रामभक्ती रक्तात मुरलेली असते.
५) **नवे कोंब मातृझाडापासून.** प्रभू श्रीरामचंद्र-हनुमानजी यांचा गुरू-शिष्य संबंध. हनुमान कधीही स्वतंत्र नाहीत; नेहमी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या मुळांशी जोडलेले.
६) फळ गोड व प्राणशक्तीने रिपूर्ण - हनुमानजी-भक्तीचा रस.
७) पाने मोठी, सावली देणारी, संकटांतून संरक्षण.
८) मुळांपासूनच नवजीवन,अमरत्वाचे प्रतीक.

**कदलीवन : एक स्वयंभू यंत्र**

केळीची झाडे जेव्हा सरळ रांगेत लावली जातात तेव्हा ते स्वतःच एक प्रचंड श्री-हनुमत्-यंत्र तयार करतात.

- **वर आकाशाकडे झुकलेली पाने-** शिवतत्त्व (ऊर्ध्वगामी ऊर्जा)
- खाली मातीत रुजलेले खोड- शक्तीतत्त्व (अधोगामी ऊर्जा)
- मधले रिकामे अंतर- वायुतत्त्वाचा मुक्त संचार
- सतत हलणारी पाने- ॐकाराचे ध्वनी-कंपन
- दाट सावली-अनाहत चक्राची शीतलता
- हिरवा रंग- हृदयचक्राचा रंग
- पानांच्या मधून गाळलेला प्रकाश- **प्राणशक्तीचे सूक्ष्म वहन**

या सर्वांमुळे कदलीवनात बसल्या-बसल्याच साधकाचे प्राणायाम आपोआप गहिरे होतात, कुंडलिनी सहज जागृत होते आणि जपाचा नाद सहस्रधा गुंजतो.

**साधनेच्या दृष्टीने प्रत्यक्ष लाभ (अनुभव-आधारित)**

**१) जप-सिद्धी :** सामान्य जागी १ लक्ष जपाला जितके फळ मिळते, कदलीवनात १००० जपाला तेवढेच फळ मिळते.
**२) भय-निवारण :** रात्री केळीच्या बागेत ११ वेळा हनुमान स्तोत्रे म्हटली, की भीती, भूत-प्रेत, इतरांचा प्रभाव तत्काळ नष्ट होतो.
**३) संकट-निवारण :** कोणत्याही मोठ्या संकटात ७ दिवस कदलीवनात राहून साधना केली, की चमत्कारिक रीतीने मार्ग निघतो.
**४) प्रत्यक्ष दर्शन :** ४१ दिवस रात्री १२ ते ३ या ब्रह्ममुहूर्तावर कदलीवनात जप केला तर प्रत्यक्ष दर्शन हमखास मिळते.
**५) रोग-निवारण :** केळीच्या झाडाखाली बसून हनुमंत जप म्हटला की दीर्घ आजार बरे होतात.

**कदलीवन-साधनेच्या विविध पद्धती (प्राचीन व आधुनिक)**

१) एक दिवसाची साधना २) ११ दिवसांची साधना ३) २१ दिवसांची साधना ४) ४१ दिवसांची संपूर्ण साधना (मडि हनुमान पद्धती) ५) १०८ दिवसांची महासाधना (फक्त उच्च साधकांसाठी) अंतिम सत्य- बाहेरचे कदलीवन व आतले कदलीवन! शेवटी सर्वांत गहन सत्य हे की बाहेरचे कदलीवन हे फक्त एक साधन आहे. खरे कदलीवन साधकाच्या हृदयात तयार करायचे असते. जेव्हा कामना-द्वेषांची तणे उपटली जातात, अहंकाराचे खोड तोडले जाते, हृदय पूर्ण शुद्ध होते, तेव्हा ते हृदय एक समृद्ध कदलीवन बनते. तेथे प्रभू श्रीराम नामाचे बीज पेरले की ते सहज उगवते, वाढते आणि आत्मज्ञानाचे फळ देते. ज्याचे हृदय असे कदलीवन बनले त्याला बाहेर शोधायची गरज नाही. कारण तेथे हनुमानजी कायमचे वास करतात.